
पॉल अर्डस

एक मुलगा ज्याचं गणितावर प्रेम होतं.

लेखिका: डेबोरा हायलिग्मन

चित्रे: लुयेन फॅम





277
71
151
347
29
11
173
7
47
113
521
23
19
229
443
61
53
401
569
73
67

ओळख

पॉल नावाचा एक मुलगा होता. त्याचं गणितावर फार प्रेम होतं. तो दिवसभर आकडेमोड, गणना आणि संख्यांचा विचार करत बसे.

तो आपल्या बुटांना फित बांधू शकत नसे, पावाला लोणी लावू शकत नसे. दिवसभर गणिताचा विचार करणाऱ्या या मुलासाठी हे जग बनलेलं नाहीये, असं त्याला बघून वाटे.

लोकांशी मैत्री करून, आपल्या कल्पना सर्वांशी वाटून घेऊन पॉलने या जगात आपला मार्ग कसा शोधला आणि तो जगातला एक प्रसिद्ध आणि लोकप्रिय गणितज्ञ कसा बनला, याची ही गोष्ट आहे.





एक मुलगा होता. त्याचं गणितावर फार प्रेम होतं. भविष्यात जगातल्या सर्वात महान गणितज्ञांमध्ये त्याची गणना होऊ लागली. त्याचा हा प्रवास एका मोठ्या समस्येमुळे सुरू झाला....





पॉल अर्डस आपल्या आईसोबत हंगेरी देशातल्या *बुडापेस्ट* शहरात राहात होता. आईचं पॉलवर अपार प्रेम होतं. पॉलसुद्धा आईवर खूप प्रेम करत असे. पॉल 3 वर्षांचा होता तेव्हा आईला गणिताची शिक्षिका म्हणून शाळेत रुजू व्हावं लागलं. आपल्या गैरहजेरीत पॉलची आबाळ होऊ नये अशी तिची इच्छा होती. म्हणून तिने पॉलला एका ओळखीच्या व्यक्तिकडे सोपवलं. ती व्यक्ती पॉलची व्यवस्थित काळजी घेऊ शकली असती. ती व्यक्ती होती....

फ्राउलिन!



फ्राउलिनचे बरेच नियम होते.



आणि ही पॉलसाठी
मोठीच समस्या होती.
कारण पॉलला नियमांचा
तिटकारा होता.


आपण केव्हा शांत
बसायचं, केव्हा
खायचं, केव्हा
झोपायचं हे दुसरं
कुणीतरी ठरवणार



या गोष्टीचा पॉलला तिरस्कार होता.



या परिस्थितीत
पॉल काय करू
शकणार होता?



तो ही समस्या सोडवू शकत नव्हता. पण पॉलला माहीत होतं की उन्हाळा आला की आई दिवसभर घरीच असेल आणि ती तिचा शंभर टक्के वेळ त्याच्यासोबत घालवेल. मग पॉल संख्या मोजायला शिकू लागला, स्वत:च! अगदी मोठ्या मोठ्या संख्यांची गणना तो करू लागला. त्यामुळे उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी किती दिवस शिल्लक आहेत, हे त्याला कळू लागलं. हे कळल्यावर त्याला फार बरं वाटत असे.

म्हणून पॉलने गणना करणं....

आणि संख्यांचा विचार करणं सुरूच ठेवलं....

पॉल 4 वर्षांचा होता तेव्हा एकदा त्याने घरी आलेल्या एका स्त्रीला तिचा जन्मदिवस विचारला. त्या स्त्रीने तिच्या जन्मदिवसाची तारीख त्याला सांगितली.

कोणत्या वर्षी जन्मला तुम्ही? त्याने विचारलं.

किती वाजता?

तिने सांगितलं.

पॉलने क्षणभर विचार केला. मग त्याने ती जन्मापासून आजवर किती सेकंदांचं आयुष्य जगली आहे, हे सांगितलं.



पॉलला अशी गणना करण्यात गंमत वाटू लागली. इतर पाहुण्यांसोबतही तो अशी गंमत करू लागला.



पॉल संख्यांशी खेळत असे. तो त्यांना मिळवत असे, वजा करत असे. एकदा त्याने लहान संख्येतून मोठी संख्या वजा केली.

उत्तर शून्यापेक्षा कमी आलं.

एखादी संख्या शून्यापेक्षा लहान कशी असू शकते?

मग आईने त्याला शून्यापेक्षा लहान असलेल्या संख्यांबद्दल सांगितलं.

शून्य

zero

शून्यापेक्षा लहान असलेल्या संख्यांना **ऋण संख्या** म्हणतात. पॉलला या संख्या खूप आवडल्या.

आपण मोठं झाल्यावर गणितज्ञ बनायचं, असं त्याने मनाशी पक्कं केलं. पण अद्याप त्याला दुसरी एक मोठी समस्या सोडवायची होती.



शाळा! योग्य वेळी आईने पॉलला शाळेत पाठवलं. पण पॉल आणि शाळा यांचा मेळ काही जमेना. पॉल खूप वेळ एका जागी स्थिर बसू शकत नसे. मग उठून तो वर्गात पळत असे. पण असं वर्तन शाळेच्या नियमाच्या विरुद्ध होतं.

आणि पॉलला नियमांचा तिटकारा होता.

त्याने आपली ही समस्या कशी सोडवली?

आपल्याला शाळेत जायचं नाही असं पॉलने आईला सांगितलं. आणखी 1 दिवससुद्धा नाही, शून्य दिवसही नाही. शाळेचे दिवस शून्यापेक्षा कमी करता आले तर! ऋण संख्यांइतके! त्याच्या मनात येई. त्याने आईला सांगितलं की तो घरीच राहाणार.





सुदैवाने, आईला सतत पॉलची चिंता वाटत असे. तिला जंतुंचं भय वाटत असे. शाळेतल्या मुलांकडून पॉलला अपायकारक जंतुंची बाधा होऊ शकते, अशी चिंता तिला खात असे.



तिने पॉलला त्याची समस्या सोडवण्यात मदत केली. आई म्हणाली तो घरी राहू शकतो -

फ्राउलिनसोबत!

फ्राउलिन शाळेपेक्षा बरी होती.

कदाचित 500 पट बरी....

फ्राउलिन आणि आईने पॉलची सगळी कामं करत. त्या....





त्याला मांसाचे तुकडे करून देत.



त्याच्या पावाला लोणी लावून देत.




त्याला कपडे घालत.



त्याच्या बुटांची फीत बांधत.

हे पॉलसाठी बरंच होतं. कारण त्यामुळे तो दिवसभर संख्यांचा विचार करायला मोकळा राहात असे. संख्या हे त्याचे घनिष्ट मित्र होते. तो त्यांच्यावर डोळे झाकून विश्वास ठेवू शकत असे. कारण संख्यांचं वर्तन कधीच बदलत नसे. संख्या नियम पाळत असत. पॉलला नियम आवडत नसत, पण त्याला संख्यांचे नियम आवडत असत. हळूहळू पॉल 7, 8, 9 वर्षांचा झाला. पण तो 10 वर्षांचा झाला तेव्हा प्रेमात पडला....



पॉलचं प्रेम जडलं
मूळ संख्यांवर.

मूळ संख्या खास असतात. त्यांचे समान भाग पाडता येत नाहीत. त्यांना फक्त स्वत:ने किंवा 1 ने भाग जाऊ शकतो.

पहिली मूळ संख्या आहे 2.

पण ही एकच मूळ संख्या सम आहे.

इतर सर्व मूळ संख्या विषम आहेत.

3, 5, 7 या मूळ संख्या आहेत.

पण सर्वच विषम संख्या मूळ संख्या नसतात. 9 ही मूळ संख्या नाही. कारण 3 x 3 केल्यावर आपल्याला 9 मिळतात.

$P = A+1 = (2 \times 3 \times 5 \times 7 \times 11 \times \ldots \times P_N)+1$



मूळ संख्यांबद्दल पॉलला अनेक शंका होत्या. त्या कधी संपतात का? त्यांच्यात काही विशिष्ट रचनाबंध आहे का? संख्या वाढवत गेलो की लगतच्या मूळ संख्यांमधलं अंतर वाढत का जातं? पॉलला मूळ संख्यांचा विचार करायला खूप आवडू लागलं.




मोठा झाल्यावर पॉलला हायस्कूलमध्ये (कॉलेजमध्ये) शिकावसं वाटू लागलं.


आता त्याला शाळा 10,00,000 पटीने जास्त आवडू लागली. तिथे त्याने अनेकांशी मैत्री केली. त्यांच्यापैकी काही त्याच्याच वयाचे होते. त्यांचंही गणितावर प्रेम होतं आणि ते गणितात कुशलसुद्धा होते.



पॉल आणि त्याचे मित्र बुडापेस्टभर गणितं करत भटकत असत.
पण पॉल त्यांच्यामध्ये सर्वोत्तम होता.
त्याला शिखरावर राहायला आवडत असे. मनोऱ्यांच्या, पर्वतांच्या आणि इमारतींच्याही!
तो सतत गणिताचाच विचार करत असे,
कुठेही असला तरी आणि काहीही काम करत असला तरी!



पॉल 20 वर्षांचा होईपर्यंत गणितज्ञ म्हणून त्याला जगभर ओळख मिळाली होती. लोक त्याला बुडापेस्टचा जादूगार म्हणत असत.



पण त्याला अजुनही आपली दैनंदिन कामं कशी करायची हे कळत नव्हतं, जसे:



आपले कपडे धुणं,



स्वयंपाक करणं,



पावाला लोणी लावणं.



ही काही फार मोठी समस्या नव्हती. तो अजूनही घरीच राहात असे आणि त्याची आईच ही सगळी कामं करत असे.

पण मग....

जेव्हा पॉल 21 वर्षांचा झाला तेव्हा काही गणितज्ञांनी एका गणिती उपक्रमासाठी त्याला इंग्लंडला आमंत्रित केलं. पॉल स्वत:च्या बळावर जगात फिरू, वावरू शकेल?



पण पॉलने एकट्याने रेल्वेचा प्रवास केला.

तो गणितज्ञांना भेटला. ते सगळे जेवायला गेले.



प्रत्येकाने संवाद केला, जेवण घेतलं पण पॉल आपल्या पावाकडे एकटक बघतच बसला. पावावर लोणी कसं लावायचं, हे त्याला माहितच नव्हतं.

शेवटी, त्याने एक सुरी घेतली, त्याला लोणी लावलं आणि ते पावावर पसरवलं. त्याला ते चांगलं जमलं. “फार अवघड नाही काही,” तो स्वत:शी म्हणाला.





पण पावाला लोणी लावता आलं तरी आपण या जगात जगण्यालायक नाही आहोत, हे लवकरच पॉलला जाणवलं.

स्वयंपाक, साफसफाई, मोटारकार चालवणं, बायका-मुलं सांभाळणं वगैरे प्रकारची कामं हा त्याचा पिंड नाही.

तो एकाच ठिकाणी राहील , एकच नोकरी करेल अशीही व्यक्ती नव्हता.
गणित करणं हाच त्याचा पिंड होता.

अजूनही त्याला नियम पाळणं आवडत नव्हतं.

म्हणून त्याने जगण्याचा आपला स्वत:चा मार्ग शोधला.

पॉलने काय केलं बघा: तो दोन लहान सुटकेस घेऊन प्रवास करत असे. सुटकेसमध्ये त्याचे काही कपडे आणि गणिताच्या वह्या असत. त्याच्या खिशात 20 डॉलरपेक्षा जास्त पैसे नसत.



पॉल न्यूयॉर्कवरून इंडियाना आणि तिथून लॉसएंजेलिसला गेला. तो जगभर फिरला, टोरांटोपासून ऑस्ट्रेलियापर्यंत. “मला घर नाही,” तो म्हणू लागला. “सारं जगच माझं घर आहे.”

जिथे जिथे तो जात असे, पोहोचत असे तिथे तिथे तेच तेच घडत असे:

एखादा गणितज्ञ पॉलला भेटायला येत असे आणि त्याला आपल्या घरी नेत असे.

तो गणितज्ञ आणि पॉल मिळून गणिती समस्या सोडवत बसत.

पॉल गणितज्ञाच्या मुलांशी खेळत असे.



पॉल मुलांना *एप्सिलॉन* म्हणत असे, कारण एप्सिलॉन ही गणितातली एक खूप छोटी संख्या आहे.

आणि पॉलची आई जशी त्याची कामं करत असे तसंच त्याचे जगभरातले मित्रदेखील त्याला सांभाळून घेत असत.



ते पॉलचे कपडे धूत,



पॉलसाठी स्वयंपाक करत,



पॉलला फळं कापून देत,



आणि पॉलची बिलं भागवत.

तसा, पॉल हा काही साधासोपा पाहुणा नव्हता.




पॉल खूप पसारा करत असे.
एकदा टोमॅटो रसाचा डबा
उघडता आला नाही म्हणून
त्याने त्यात थेट चाकूच
खुपसला.



पॉल नेहमी सकाळी 4 वाजता त्याच्या यजमानांना जागं करून म्हणत असे,
“माझा मेंदू मोकळा आहे!” याचा अर्थ, तो गणित करायला सज्ज आहे.

तो दिवसातले 19 तास गणित करायला तयार असे.




दिवसाचे 19 तास x
7 दिवस =
आठवड्याचे 133
तास.


New York Post
FBI DEFEATS SPY SCARE
3 ALIENS JUST STUDENTS


तरुणपणी पॉल एकदा नियम
मोडल्यामुळे एका मोठ्या
संकटात सापडला. तो रेडियो
मनोरा बघण्यासाठी कुंपणावरून
चढून गेला.

पोलिसांनी त्याला अटक केली.
तो गुप्तहेर आहे, असा संशय
पोलिसांना आला. त्यामुळे नंतर
कित्येक वर्षे त्यांनी पॉलवर
पाळत ठेवली.



जगभरातल्या त्याच्या मित्रांनी
त्याला साथ का दिली?
त्याची काळजी का घेतली?
त्याला पॉल काका म्हणत
त्याच्यावर प्रेम का केलं?

पॉल अर्डस प्रतिभावंत होता. तो आपली बुद्धीमत्ता इतरांसोबत वाटत असे. त्याने लोकांना त्यांच्या समस्या सोडवण्यात मदत केली. तो लोकांना छोट्या छोट्या समस्या सुचवतही असे. याशिवाय तो एक कुशल गणिती समन्वयकही होता. त्याने जगभरातल्या गणितज्ञांची एकमेकांशी भेट घडवून आणली जेणेकरून, ते एकत्र काम करू शकतील. पॉल जाणत होता:



पॉल आणि त्याच्या मित्रांनी मिळून मोठमोठ्या गणिती समस्या सोडवल्या. त्यांनी *नंबर थिअरी, कॉंबिनेटोरिक्स, प्रोबॅबिलिस्टीक मेथड* आणि *सेट थिअरी* अशा गणिती शाखांमध्येही काम केलं.



पॉलने गणित सोडवण्याच्या विलक्षण नव्या आणि सोप्या पद्धती आपल्या मित्रांना दाखवल्या.

त्याने नव्या पद्धतीचं गणितदेखील सुरू केलं.

पॉल आणि त्याच्या मित्रांनी केलेल्या काही गणितांनी आपल्याला जास्त कार्यक्षम संगणक आणि सर्च इंजिने दिली. त्यांचा वापर गुप्तहेर खात्यात जास्त चांगले संकेत बनवण्यासाठी होतो.



पॉल काका आपली बुद्धीमत्ता आणि पैसा यांबाबत अगदी उदार होते. त्यांना मिळणारा पैसा ते लोकांना वाटून टाकत. त्यांनी गरीबांना पैसा दान केला आणि गणितातल्या न सुटू शकलेल्या समस्या सोडवण्यासाठी पुरस्कारही दिले.




एवढंच नव्हे, खूप म्हातारे झाले तेव्हाही पॉल गणितं करत राहिले.


ते बुद्धिबळ खेळता खेळता गणितंही करत असत.



ते कॉफी पिता पिता गणितं करत. त्यामुळे दिवसभरात त्यांची भरपूर कॉफी पिऊन होत असे.



ते आपल्या जवळच्या मित्रांसोबत टेबल-टेनिस खेळत तेव्हाही गणिताचा विचार करत.



आपण गणितं सोडवणं बंद करणार नाही, असं पॉलने म्हटलं होतं. त्याने ते खरं करून दाखवलं. गणित बंद करणं म्हणजे मरून जाणं, असं पॉल म्हणत असे.

त्यामुळेच पॉल एका गणित सभेत उपस्थित असतानाच हे जग सोडून गेले.

जगभरातले गणितज्ञ आजही पॉलविषयी चर्चा करतात, त्यांच्यावर प्रेम करतात. पॉलला कधीही न भेटलेले लोकसुद्धा यात सामील आहेत.

लोक आपल्या *अर्डस क्रमांका*विषयी बोलतात. जर कुणी पॉलसोबत गणित सोडवलं असेल तर त्याचा अर्डस क्रमांक 1. जर तुम्ही पॉलसोबत काम केलेल्या व्यक्तिसोबत काम केलं असेल तर तुमचा अर्डस क्रमांक 2. लोकांना आपल्या अर्डस क्रमांकाचा अभिमान वाटे.





फार फार वर्षांपूर्वी एक मुलगा होता. त्याचं गणितावर फार प्रेम होतं. त्याची संख्याशी घनिष्ट मैत्री होती. मोठा झाल्यावरही त्याचं गणितावरचं प्रेम कमी झालं नाही. संख्या आणि लोक हे नेहमीच त्याचे घनिष्ट मित्र राहिले. त्याला या मित्रांची अडचण वाटली नाही कधी.

लेखकाचं मनोगत

मी लहान होते तेव्हा वाचन आणि लिखाणाइतकंच माझं गणितावरही प्रेम होतं. पण वय वाढू लागलं तसं मला वाटू लागलं की गणित विषय माझ्यासाठी नाही. मग मी एका महान गणितज्ञावर पुस्तक का लिहिलं? याचं सारं श्रेय माझ्या दोन मुलांना जातं. माझा मोठा मुलगा *आरोन*, याला बालपणापासूनच गणित आवडत होतं. तो विरंगुळा म्हणून गणित सोडवत बसे. एकदा त्याने मला पॉल अर्डस नावाच्या गणितज्ञाविषयी सांगितलं. माझा छोटा मुलगा *बेंजामिन* गणितप्रेमी नव्हता, पण त्यानेही एकदा अर्डसचा उल्लेख केला. तेव्हा मला वाटलं की या व्यक्तिबद्दल जास्त माहिती घेतली पाहिजे. याच प्रवासात मला पॉल आणि त्याच्या आयुष्याबद्दल जिव्हाळा वाटू लागला.

पॉल हा असामान्य व्यक्ती होता. खरंतर तो या जगात मावणारा प्राणी नव्हताच. तरीही त्याने आपली विलक्षण कारकिर्द घडवली, हजारो मित्र जमवले. मला त्याचं औदार्य भावलं. तो प्रतिभावंत होता, त्याने एकहाती काम केलं अशी काहीशी त्याची प्रतिमा आपल्या मनात आहे. एका निष्णांत गणितज्ञाची अशीच प्रतिमा असते, नाही का? गणितज्ञ एकटा काम करतो, समस्यांशी झुंजतो, संख्यांशी खेळतो. पण पॉल आपली बुद्धिमत्ता इतरांसोबत वाटत असे. एक मित्र त्याला मधमाशी म्हणत असे. कारण त्याने भटकंती करून गणिताचे परागकण गोळा केले होते. त्यामुळे गणिताच्या नवनव्या शाखा निर्माण झाल्या. गणित मजेशीर आणि सामाजिक होऊ शकतं, हे पॉलने जगाला दाखवून दिलं. सॅनफ्रान्सिस्कोतल्या एका चर्चच्या भिंतीवर पॉलचं छायाचित्र एका संताच्या रुपात लावलं आहे. ते तिथे नसतं तर मीच तशी शिफारस केली असती.

पॉल अर्डसवर पुस्तक लिहिणं एक आव्हान होतं. त्याच्या आयुष्यातल्या अनेक आकर्षक गोष्टी यात सामील करता आल्या नाहीत. उदाहरणार्थ, काही दुःखद घटना. पॉल अर्डसचा जन्म 26 मार्च 1913 रोजी, बुडापेस्टमध्ये झाला. पॉलची आई त्याला जन्म देण्यासाठी हॉस्पीटलमध्ये होती तेव्हा त्याच्या दोन्ही बहिणींचा स्कार्लेट तापाने मृत्यू झाला. पॉलचे आईवडील उध्वस्त झाले. आईने नंतर पॉलला सांगितलं की त्याच्या बहिणी त्याच्यापेक्षाही हुशार होत्या.

पॉल तीन वर्षांचा होता तेव्हा त्याचे वडील पहिल्या महायुद्धात लढण्यासाठी गेले. त्यांना पकडण्यात आलं आणि सायबेरीयाच्या तुरुंगात ठेवण्यात आलं. त्यामुळे पॉलच्या आईला पॉलच्या सुरक्षेबद्दल नेहमी काळजी वाटत असे. पॉलला त्याच्या वडिलांनी अनेक गोष्टी शिकवल्या. त्यांनी पॉलला मूळसंख्यांची ओळख करून दिली, इतर गणित शिकवलं, इंग्रजी व फ्रेंच बोलायला शिकवलं. युद्धबंदी असताना त्याच्या वडिलांनी या भाषा शिकल्या होत्या.

चेबचीव नावाच्या एका व्यक्तिचं प्रमेय सिद्ध केल्यावर पॉल नावारुपाला आला. एका गणितज्ञानुसार पॉल विनम्रतेने म्हणत असे: “चेबचीव जे म्हणाला तेच मी पुन्हा सांगितलं. N आणि 2N यांच्या दरम्यान एक मूळसंख्या नेहमीच आढळते.” पॉलच्या मते सर्व सिद्धता मोहक आणि साध्यासरळ असल्या पाहिजेत. त्याची कल्पना होती की देवाने त्याच्या पुस्तकात सर्व मोहक सिद्धता लिहिलेल्या आहेत.

पॉलने घराबाहेर पहिला प्रवास केला 1934 साली. तो इंग्लंडमधल्या मँचेस्टर शहरात गेला. त्याला युरोप सोडायचं नव्हतं. पण नाझींची सत्ता आल्यावर पॉल आणि त्याच्यासारखे अनेक ज्यू लोक संकटात सापडले. 1938 साली पॉलच्या आईवडिलांनी त्याने अमेरिकेत जावं असं सांगितलं. दुसऱ्या महायुद्धात पॉलचे अनेक नातलग मारले गेले. त्याच काळात त्याच्या वडिलांना नैसर्गिक मृत्यू आला. सुदैवाने त्याची आई मात्र बचावली.

1941 साली पॉल उत्साहाच्या भरात एका रेडियो मनोऱ्याच्या कुंपणावर चढला. तो युद्धाचा काळ होता आणि अमेरिकी लोकांना परदेशी लोकांबद्दल संशय वाटे. पॉलला विचारण्यात आलं तेव्हा तो उत्तरला की त्याने “प्रवेशबंदी” हा फलक वाचलाच नाही. कारण तो गणिताचा विचार करत होता. कदाचित हे खरंही असावं, पण अमेरिकी सरकारने या दृष्टिकोनातून विचार केला नाही. त्यांना वाटलं की पॉल गुप्तहेर होता. 1954 साली, शीतयुद्धादरम्यान, तो ॲमस्टरडॅम येथील आंतरराष्ट्रीय गणितज्ञ संमेलनात भाग घेऊ इच्छित होता. त्याला अमेरिकेचा परतीचा व्हिसा हवा होता. त्याची चौकशी पूर्ण झाली तेव्हा त्याने सर्व प्रश्नांची प्रामाणिकपणे उत्तरं दिली. पण त्याची काही उत्तरं, तो निर्दोष असला तरी (जसं, तो आईला भेटण्यासाठी हंगेरीला गेला होता), अधिकाऱ्यांना अमेरिकेसाठी धोकादायक वाटली. अधिकाऱ्यांनी त्याला अमेरिकेत पुन्हा प्रवेशाची परवानगी नाकारली. तरीही पॉलने प्रवास केला. त्याला अजूनही नियमांचा तिटकारा होता. पुढचं एक दशकभर त्याला अमेरिकेत परतायची परवानगी मिळाली नाही.

पॉलची आई दिर्घकाळ जगली. बराच काळ ते एकमेकांपासून दूर राहिले. पण तरीही ते मनाने एकमेकांच्या नजिकच असत. कधीकधी आईसुद्धा पॉलसोबत गणिताच्या सभांना जात असे.

20 सप्टेंबर 1996 रोजी, पोलंडच्या वॉर्सा शहरात एका गणितज्ञ सभेत पॉलचं निधन झालं. पण आजही तो गणितज्ञांना प्रेरणा देतो. पॉलच्या न सुटलेल्या समस्यांसाठी पुरस्काराची रक्कम आजही शिल्लक आहे आणि लोकांना अजूनही अर्डस क्रमांक मिळत आहेत.